**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट दिनांक - २३/१०/२०२२

## दि.२२/१०/२०२२ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली ५६९/२०२२ भा.द.वि.कलम-३०७,३२३,५०४,५०७,३४,४२७, आर्म अॅक्ट कलम ४(२५), क्रिमिनल अमेटमेंटकलम ३,७, प्रमाणे, |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | २२/१०/२०२२ रोजी १६/३० वा.सुमारास करविर बस स्टॉप जवळ रुपीनगर, चिखली, पुणे.येथे |
| गुन्हा दाखल | :- | २२/१०/२०२२ रोंजी ००.३० वा. |
| फिर्यादी | :- | सचिन चंद्रकांत मोरे, वय - ३३ वर्ष, रा - अष्टविनायकचौक, विठ्ठल मंदिराचे शेजारी, माऊली हौसिंग सोसा., मोरे वस्ती, चिखली, पुणे. |
| आरोपी | :- | शुंभम कदम वय २१ वर्ष रा.माऊली हौसींग सोसायटी रुपीनगर तळवडे पुणे व त्याच`दोन मित्र पुर्णनाव पत्ता माहीत नाही. **अटक नाही** |
| तपशिल | :- | नमूद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादि हे दुकाणामध्ये असताना आरोपीत शुभम कदम व त्याचे दोन मित्र यांनी तळवडे रोडवरील करविर बस स्टॉप येथे व जवळच असलेल्या फिर्यादि यांचे दुकाणाचे समोर आप-आपसात जोराची भांडणे करुन दहशत माजवुन वाईट-वाईट शिवीगाळ करुन फिर्यादि व नागरींकांना जिवे मारण्याची धमकी देवुन फिर्यादि यांची गाडीची पुढील बाजुची काच फोडुन नुकसान करुन, फिर्यादि यांना शुभम कदम याने जिवे मारण्याच्या उद्देशाने कोयता फिर्यादीचे तोंडावर मारुन फिर्यादि यांचे नाकावर व उजव्या हातावर जबर दुखापत केली व सोडवायला येणा-या नागरीकांना लाथाबुक्क्यानी जोराची मारहाण करुन“आम्ही इथले भाई आहोत, आमच्यामध्ये यायचे नाही, नाहीतर ऐका-ऐकाला खल्लास करील असे बोलुन मोठमोठयाने आरडा-ओरडाकरुन वाईट-वाईट शिवीगाळ”तसेच“आम्ही इथले भाई आहोत, आमचे कोणी काही वाकडे करुनाय शकत, कोणी मध्ये आला की आम्ही त्याला तोडला समजायचे” असे बोलुन दहशत माजवली आहे, म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि एम डी मुळीक ७९७२५५८७४१ |

२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | आळंदी ३२०/ २०२२ भा.द.वि.क ३५४, ३२३.५०४.५०६,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | २०/१०/२०२२ रोजी १३/३० वा. चे सुमारास मौजे कोयाळी तर्फे चाकण गावाचे हद्दीत ता. खेड.जि पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | २२/१०/२०२२ रोंजी ००.३० वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी वय ३८ वर्षे |
| आरोपी | :- | १) संतोष दशरथ साळुंखे २) सायली साळुंखे ३) महिला आरोपीत सर्व रा.कोयाळी ता. खेड. जि.पुणे. **अटक नाही.** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी व त्यांची बहिण सातव अशा दोघी जणी आई वडिलांना भेटण्यासाठी कोयाळी येथे गेले होते.आई वडिल घरी होते व भाउ गणेश हा कामानिमित्त खेड येथे गेला होता. आईने सांगितले की, आमचेकडुन संतोष साळुंखे यांनी खरेदी केलेल्या जमिनीचे उर्वरित पैसे न देता ते खरेदी केलेल्या जमिनीत घराचे बांधकाम करित आहेत. असे सांगितल्याने फिर्यादी हे त्यांचे आईला आपण जाउन सांळुंखे यांना तुम्ही खरेदी व्यवहाराचे पैसे दिल्यानंतर बांधकाम करा असे विचारू तु आमचे सोबत चल असे त्यांच्यात बोलणे |

होउन आई व दोघी बहिणी भाउ गणेश यांने विकलेल्या जमिनीच्या ठिकाणी दुपारी ०१/०० वा. चे सुमारास गेले होते.सदर ठिकाणी कोणीही नसल्याने फिर्यादी जवळच बांधकाम चाललेल्या ठिकाणी झाडाखाली थांबले त्यांनतर दुपारी ०१/३० वा.चे सुमारास संतोष साळुंखे हे सिंमेंटचा टेम्पो घेउन आले व त्यावेळी त्यांचेसोबत दोन पोलीस होते व संतोष साळुंखे सदर ठिकाणी थांबले त्यावेळेस फिर्यादी संतोष सांळुंखे यांना तुम्ही आमच्या भावाचे राहिलेले पैसे दया व नंतर घराचे बांधकाम करा असे फिर्यादी व आरोपी यांच्यात बोलणे चालु असताना संतोष साळुंखे त्याचे मोटार सायकलीवरून गेले व थोडयाच वेळात मोटार सायकलवरून त्यांची मुलगी सायली हिला घेउन तेथे आले.त्याच वेळेस त्यांची सुन उज्ज्वला साळुखे ही पण तेथे आली .आम्ही संतोष साळंखे यांना व्यवहार पुर्ण करून बांधकाम पुर्ण करा असे समजुन सांगत असताना संतोष साळुंखे यांने तुम्हाला लय माज आला आहे काय असे म्हणुन शिवीगाळ करून फिर्यादी यांच्या पोटात लाथ मारून फिर्यादी यांची छाती पकडुन त्यांचे मनात लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले त्याचवेळेस त्याची मुलगी सायली व सुन उज्ज्वला साळुखे हयांनी फि ला शिवीगाळ करून हाताबुक्याने तोंडावर तसेच पाठीत मारहाण केली.त्याच वेळेस फि यांची बहिण छाया सातव ही फि ला सोडविण्यासाठी आली असताना संतोष साळुंखे याची मुलगी सायली व त्याची सुन उज्ज्वला साळुखे हया दोघींनी तिलाही हाताने मारहाण करून शिवीगाळ केली.त्याचवेळेस संतोष साळुंखे फि यांना परत तुम्ही इथे यायचे नाही,तुमचा इथे यायचा काहीएक संबंध नाही,तुम्ही आला तर मी एकेकाला जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिल्याने त्याचवेळेस फिर्यादी यांची बहिण नामे छाया हिने थोडया वेळापुर्वी पोलीसांना फोन केल्याने आळंदी पोलीस ठाण्याचे पोलीस आले व त्यांचे समक्ष देखिल संतोष साळुखे यांनी मला हाताबुक्याने मारहाण केली फिर्यादी व आरोपी या दोन्ही बाजुच्या लोकांना तक्रार देणेसाठी पोलीस ठाण्यात बोलविले म्हणून गुन्हा नोंद

| | | |
|---|---|---|
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि जोंधळे ८३०८४४०९०० |

३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | आळंदी ३२१/२०२२ भा.द.वि.क ३५४, ३२३,५०४,५०६, १४३, १४७,१४९ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | २०/१०/२०२२ रोजी ११.०० ते १३/३० वा.चे सुमारास मौजे कोयाळी तर्फे चाकण गावाचे हद्दीत ता. खेड. जि.पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | २२/१०/२०२२ रोजी ०१.५७ वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी वय २२ वर्श |
| आरोपी | :- | १)गणेश गुलाब भाडळे, २)नाना कोंडीबा भाडळे, ३)आकाश नाना भाडळे तिघे रा.कोयाळी ता खेड जि पुणे व ४) वैशाली संजय मोझे रा. लोहगाव पुणे, ५)छाया सोमनाथ सातव रा. वाघोली पुणे<br>**अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी खरेदी केलेल्या जागेवर गोठयाचे बांधकाम चालु असल्याने तेथील कामावर देखरेख करण्याकरीता फिर्यादी यांना त्यांचे सासरे संतोश यांनी मोटार सायकलवर आणुन सोडले तेव्हा थोडावेळ फिर्यादी यांचे सासरे तेथे थांबले त्यावेळी कामगारांनी सिमेंट संपल्याचे सांगितल्याने ते सिमेंट आणण्यासाठी गेले होते.व कामाच्या ठिकाणी पाच कामगार काम करत होते.त्यावेळी फि कामाचे ठिकाणी हजर असताना मुळ जागा मालक गणेष भाडळे हे त्या ठिकाणी आले व त्याने फि यांना व कामगारांना तुम्ही येथे थांबायचे नाही. तुम्ही येथे थांबले तर मी एका-एकाला जिवे मारतो अषी धमकी देवुन निघुन गेले.त्यामुळे फि हे घावरून शेजारील नवनाथ भाडळे यांचा मोबाईल फोन घेवुन फि यांचे सास-यांना फोन करून सदरचा प्रकार सांगितला त्यावेळी तेथे वैशाली संजय मोझे रा. लोहगाव पुणे, व छाया सोमनाथ सातव रा. वाघोली पुणे, आकाश नाना भाडळे , नाना कोंडीबा भाडळे हे त्या ठिकाणी येवुन फि ला व कामगारांना हाताबुक्याने मारहाण शिवीगाळ करू लागले. थोडयाच वेळात फि चे सासरे हे फि ची नणंद सायली यांना घेवुन आले फि चे सासरे हे नाना भाडळे यांना समजुन सांगत असतांना त्यांनी सासरे यांना मारहाण करून शिवीगाळ करू लागले त्यादरम्यान तेथे असलेल्या वैशाली मोझे व छाया सातव या दोघींनी नणंद सायली हिस हाताबुक्याने मारहाण करून शिवीगाळ करू लागल्या त्याच वेळी तेथे उभे असलेले आकाष भाडळे हे माझे नणंदे जवळ आले व तिचे अंगावरील ड्रेस ओढला व तिचे छातीस हात लावला व तिचे मनास लज्जा होईल असे वर्तन केले व नणंद |

| | | |
|---|---|---|
| | | सायली हिचा अंगावरील ड्रेस फाटल्याने तेथे शेजारी असलेले समिक्षा हॉटेलचे मालकाचे पत्नीकडे जावुन स्टोल घेवुन अंगावर टाकला.म्हणून गुन्हा नोंद |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मपोउनि माने ८८०५१३७०५४ |

४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | निगडी ७४०/२०२२ भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | २०/१०/२०२२ रोजी १०.०० वा ते १९.०० वा चे दरम्यान श्री सेवा सर्व्हिसेस बजाज ॲटो शोरुम फोर्स मोटर्स मटेरियलगेट च्या समोर आकुर्डी रोड |
| गुन्हा दाखल | :- | २२/१०/२०२२ रोजी ०३.५३ वा |
| फिर्यादी | :- | ऋषभ अनिल वैराट वय २३ वर्षे रा साईकृपा हौसिंग सोसायटी बि नं बी /२० फलॉट नं ३०६ घरकुल चिखली पुणे. |
| आरोपी | :- | अज्ञात चोरटा |
| तपशिल | :- | नमूद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांची ९०,०००/- रु.किं.ची बजाज कंपनीची ॲटो रिक्षा नं एमएच १४ जे पी ०३६० ही श्री सेवा सर्व्हिसेस बजाज ऑटो आकुर्डी या शोरुमच्या बाजुला लॉक व पार्क केली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने स्वतःच्या आर्थिक फायदयाकरीता फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने चोरुन नेली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोना १८४८ लांघी ९५९४०२५३३२ |

५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | रावेत १०५/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३७९ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | २१.१०.२०२२ रोजी १६.३० ते १९.३० वा. चे दरम्यान पिपरी ते पुनावळे प्रवासा दरम्यान |
| गुन्हा दाखल | :- | २२/१०/२०२२ रोजी ०३.५३ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी वय ६७ वर्षे |
| आरोपी | :- | अज्ञात चोरटा |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी आरोपीत यांनी फिर्यादी यांचे पवना बॅक रावेत येथुन सुनेचे व नातीचे दागिने काढुन नातीचे कपडे बदलण्यासाठी पिंपरी मध्ये गेले कपडे बदलुन किरकोळ खरेदी केली व तेथुन परत घरी जाण्यासाठी निघलो. घरी गेल्यानंतर फिर्यादी यांनी बॅकेच्या लॉकर मधुन काढलेल्या वस्तु सोन्याचे दागिने चेक केले असता ते मिळुन आले नाहित म्हणुन फिर्यादीची खात्री झाली कि, रावेत ते पिंपरी दरम्यान खरेदी करित असताना गर्दीचा फायदा घेवुन कोणी तरी अज्ञात इसमाने लबाडीचे इराद्याने स्वतःचे फायद्याकरीता ११ तोळे ०८ ग्रॅम सोन्याचे दागिने किंमत रुपये ३,५५,०००/- व ८०००/- रोख रक्कम असे एकुण ३,६३,५००/- रु चोरी करुन नेले आहे. |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि जाधव ९४०३६४८६९० |

६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | निगडी ७३९/२०२२ भा.द.वी. कलम ३८०. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | २२/१०/२०२२ रोजी ०३.३० वाजण्याचे सुमारास सतिष काटे यांची चाळ,खोली नंबर २, दत्तवाडी दत्तमंदीराचे पाठीमागे, आकुर्डी पुणे. येथे राहते घरच्या उघडया दरवाजावाटे. |

गुन्हा दाखल :- २२/१०/२०२२ रोजी ०३.५३ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी वय २५ वर्षे

आरोपी :- अज्ञात चोरटा

तपशिल :- नमूद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादीचे राहते घरच्या उघडया दरवाजा वाटे कोणीतरी अज्ञात चोरटयाने प्रवेश करुन लबाडीचे ईरादयाने स्वताहाचे फायदयाकरीता काळे रंगाचे पर्स मधुन १,१०,०००/- रु.किं.चे २६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिणे व पतीचे पॅन्टच्या खीशातील १०,०००/- रु.रोख रक्कम म्अशी एकूण १,२०,०००/- रु.किं.ची चोरी करुन चोरुन नेली आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सहा.फौज व्ही एस वाघोले ९८२२१७१४१७

७.

पोस्टे व गु.रजि.नं. :- रावेत १०६/२०२२ भा.द.वि.सं. कलम ४२०,४०६ प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- ०४/०३/२०२१ ते २१/०५/२०२२ रोजी दरम्यान रहाते घरातुन फिर्यादी यांचे वर नमुद पत्त्यावरुन

गुन्हा दाखल :- २२/१०/२०२२ रोजी १८.५३ वा

फिर्यादी :- पराग प्रभाकर बोरोले, वय ५२ वर्षे, रा. ॲक्वा मिलिनियम सोसा., मुक्ताईनगर, एस बी पाटील कॉलेज रोड, रावेत, ता. हवेली जि.पुणे

आरोपी :- साईद रिहान, रा. ४४ सेकंड स्टेज, इश्वरा टेंपल, कुरुबराहल्ली, बेंगलोर, राज्य कर्नाटक,
**अटक नाही.**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी आरोपीत यांनी फिर्यादी व त्यांचे मित्र तसेच नातेवाईक यांना चारधाम यात्रे करीता लागणारे पॅकेजची माहिती देवुन हॉटेल बुकींग, विमान व हेलिकॉप्टर बुकींग, गाडी बुकींग अशा विवीध कारणासाठी ॲडव्हान्स पैसे जमा करण्यास सांगीतले वरुन फिर्यादी व त्यांचे मित्र तसेच त्यांचे नातेवईक यांनी आरोपीत यांचे बँक खात्यावर ऑनलाईन पध्दतीने ११,०४,०८७ /- रुपये (अकरा लाख चार हजार सत्याऐंशी रुपये) एवढी रक्कम जमा केली. आरोपीत यांने फिर्यादी व त्यांचेबरोबर असलेल्या नागरीकांचा चारधाम यात्रेकरीता घेऊन जातो असे म्हणुन विश्वास संपादन करुन फिर्यादी व इतर नागरीक यांचा विश्वासघात करुन ११,०४,०८७/- रुपयांची आर्थीक फसवणुक केली आहे. म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रार अर्जवरुन आज रोजी गुन्हा दाखल केला आहे.

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि शिवदास गायकवाड, ९८२३७११७१८

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ८९३/२०२२, कलम ४०६, ४१९, ४२० भादंवि. सह कलम ६६ (क), (ड) आय.टी. ॲक्ट.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- १९/१०/२०२२ रोजी १८.०० वा. चे दरम्यान. एस ४०६, निसर्ग हार्दिक, फेज ०२ बळीराज कॉलनी, राहटणी, वाकड, पिं.चिं. पुणे.

गुन्हा दाखल :- २२/१०/२०२२ रोजी १३.३७ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी, वय ३४ वर्ष,

आरोपी :- अनोळखी मोबाईल धारक, बँक खाते धारक, लिंक मोबाईल धारक व तपासात निष्पन्न होणारे इतर अनोळखी इसम.
**अटक नाही**

तपशिल :- १९/१०/२०२२ रोजी १८.०० वा. चे दरम्यान, मो.नं. वरुन अनोळखी मोबाईल धारकांनी तक्रारदारांना, ते डी.टी.डी.सी. कुरीयर कंपनीतुन बोलत असल्याचे खोटे सांगुन, त्यांनी खरेदी केलेल्या कुरीयरसंबंधी सर्व माहीती

दिली व त्यांचे कुरिअर डिॲक्टीव्हेट झाले आहे व ते गोडाउन मध्ये अडकले असल्याचे खोटे सांगितले व त्यासाठी तक्रारदारांचे मो.नं. यावर एक लिंक http://youmoneypaye.info ही पाठवुन त्या लिंकवर क्लिक करणेस सांगितलेने क्लिक केले असता, त्यांचे स्टँडर्ड चार्टर्ड बँकेच्या अकाऊंट यावरुन रु. ४५,०००/- व एसबीआय. बँक खाते यावरुन रु. ९९,९९९/- असे एकुण रु. १,४४,९९९/- ऑनलाईन पद्धतीने कट करुन घेवुन त्यांची ऑनलाईन फसवणुक केली व ती रक्कम तात्काळ फेडरल बँक व त्यामधुन एचडीएफसी. बँक खात्यात ट्रान्सफर करुन सदर रक्कमेचा अपहार केला. म्हणुन ठी तक्रार दिल्याने गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि. एस. एस. जाधव, ९६५३३०६१५६ |

९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी ६२४/२०२२ भादवि कलम ३९२ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | २२/१०/२०२२ रोजी २२/२० वा.चे सुमारास महाबली चौकाचे पुढे, श्री समर्थ को ऑप हौसिंग सोसायटी गेट समोर, शाहुनगर चिंचवड येथे |
| गुन्हा दाखल | :- | २३/१०/२०२२ रोजी ०२.०३ वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी वय ४६ वर्ष |
| आरोपी | :- | काळे रंगाचे मोटार सायकल (नंबर माहिती नाही) वरील एक अनोळखी इसम |
| तपशिल | :- | नमूद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी व त्याची मैत्रीण असे महाबली चौकातुन बहिरवाडे ग्राउंडकडे जाणा-या रोडवर वॉर्कीग करत असताना श्री समर्थ को ऑप हौसिंग सोसायटी गेट समोर पाठीमागुन आलेल्या एका मोटार सायकल वरील इसमाने फिर्यादीचे गळयातील ७५,०००/- रु.किं.चे ३ तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र जबरदस्तीने हिसका मारुन चोरुन नेले आहे. |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि ए.बी. तरंगे, ८३२९११५२९४ |